## MAHARASHTRA ACT NO. IX OF 1987

### THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS (TEMPORARY POSTPONEMENT OF CERTAIN ELECTIONS DUE TO DROUGHT CONDITIONS IN THE STATE) ACT, 1987

९८५ चा हाराष्ट्र १८.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १५ एप्रिल १९८७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एच. के. कुलकर्णी,
सहसचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

:८६ चा
ाराष्ट्र
यादेश
ांक ८.

## MAHARASHTRA ACT No. IX OF 1987

### AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN VILLAGE PANCHAYATS

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १६ एप्रिल १९८७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

### सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

**विवक्षित ग्रामपंचायतींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९५९ चा मुंबई ३. **ज्याअर्थी,** "मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८" याच्या कलम २७ अन्वये पंचायतीच्या सदस्यांचा पदावधी ५ वर्षे एवढा आहे ; व हा पदावधी पंचायतीच्या स्थायी समितीशी विचार-विमर्श केल्यानंतर केवळ आणखी सहा महिने वाढविणे शक्य आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्यातील २९ जिल्ह्यांमधील २४,८०० पंचायतीपकी १९,७०० पंचायतीच्या सदस्यांच्या निवडणुका मार्च १९८४ पासून यापूर्वीच घेण्यात आलेल्या आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियमाच्या कलम ११ अन्वये पंचायतीच्या सदस्यांच्या निवडणुका जिल्हाधिकारी याबाबतीत नियत करील अशा तारखेस आणि नियमाद्वारे विहित केलेल्या रीतीने घेणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील बहुसंख्य जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवर्षणाची परिस्थिती असल्यामुळे पंचायत निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असणारे जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांना अवर्षण निवारणाची कामे व टंचाई निवारणाच्या उपाययोजना या कामांना, तसेच पिण्याच्या पाण्याची तरतूद करणे इत्यादी कामांना सर्वप्राथम्य देऊन त्या कामी आपले सर्व प्रयत्न केंद्रित करणे आवश्यक झाल्याने निवडणुकांच्या कामाला ते उपलब्ध होऊ शकले नाहीत ; आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजनांच्या कामी पूर्णपणे गुंतलेल्या अशा अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा काढून घेऊन त्यांचा उरलेल्या पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याच्या कामी वापर करणे शक्य होणार नव्हते ;

आणि ज्याअर्थी, काही मतदार जेथे रोजगार हमी योजनेखालील कामे उपलब्ध होती अशा इतर ठिकाणी उपजीविकेसाठी गेले असण्याची शक्यता असल्याने आणि अशा प्रकारच्या स्थलांतरामुळे अंतिमतः त्यांना आपल्या मतदानाच्या अधिकारास मुकावे लागण्याची शक्यता असल्याने अशा बिकट परिस्थितीतील अशा निवडणुका घेणे हे एकंदर जनतेच्या दृष्टीनेही गैरसोयीचे ठरणार होते ;

आणि ज्याअर्थी, या व इतर कारणांसाठी उरलेल्या पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका विवक्षित मुदतीसाठी तात्पुरत्या लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, अशा प्रकारे निवडणुका लांबणीवर टाकल्यामुळे विवक्षित पंचायतींच्या विद्यमान सदस्यांचा तसेच इतर विवक्षित पंचायतींच्या प्रशासकांचा पदावधी यथोचितरीत्या वाढविणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, विवक्षित पंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व परिणामी पूर्वोक्तानुसार सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी वाढविणे यासाठी तसेच त्यांच्याशी संबंधित असलेल्या इतर बाबींची तरतूद करण्यासाठी राज्यपालांनी त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती ; आणि म्हणून त्यांनी दिनांक २३ जानेवारी १९८७ रोजी 'महाराष्ट्र ग्रामपंचायती (राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे विवक्षित निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८७' प्रख्यापित केला होता ; (१९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.)

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव प्रारंभ व मुदत. १. (१) या अधिनियमास 'महाराष्ट्र ग्रामपंचायती (राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे विवक्षित निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८७' असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक २३ जानेवारी १९८७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो दिनांक ३१ ऑक्टोबर १९८७ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्या आधीच्या दिनांकापर्यंत अंमलात राहील व त्यानंतर समाप्त होईल. या अधिनियमाची मुदत संपल्यावर जणू काही तो महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आल्याप्रमाणे मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ चे कलम ७ लागू होईल. (१९०४ चा मुंबई १.)

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रशासक" याचा अर्थ, पंचायत अधिनियमाच्या कलम १५९ व १६० च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये नियुक्त केलेला प्रशासक असा असून, त्यामध्ये, त्या अधिनियमाचे कलम १४५, पोट-कलम (२), खंड (ब) किंवा कलम १५१, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तींचा समावेश होतो ;

(ब) "पंचायतीची निवडणूक" याचा अर्थ या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्यानंतर होऊ घातलेली किंवा होण्याची शक्यता असलेली पंचायतीच्या सदस्यांची निवडणूक, परंतु त्यामध्ये सरपंच किंवा उपसरपंच यांच्या निवडणुकीचा अंतर्भाव होणार नाही ;

(क) "पंचायत" याचा अर्थ, पंचायत अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेली किंवा स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येणारी पंचायत ;

(ड) "पंचायत अधिनियम" म्हणजे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ ; १९५९ चा मुंबई ३.

३. पंचायत अधिनियमामध्ये किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

पंचायतींच्या विवक्षित निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे आणि त्यांच्या सदस्यांचा आणि प्रशासकांचा पदावधी वाढवणे.

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दिनांक ३१ ऑक्टोबर १९८७ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंतच्या किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्यापूर्वीच्या दिनांकापर्यंतच्या मुदतीत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त मुदत" असा करण्यात आला आहे) एखाद्या पंचायतीची कोणतीही सार्वत्रिक निवडणूक व कोणत्याही पंचायतीतील कोणतेही प्रासंगिक रिक्त पद भरण्यासाठी घ्यावयाची पोट-निवडणूक तसेच ज्या निवडणुकीच्या निरनिराळ्या टप्प्यांच्या तारखा जिल्हाधिकाऱ्यांकडून, तहसिलदारांकडून किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात आल्या आहेत, अशा पंचायतीच्या निवडणुका घेण्यात येणार नाहीत.

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी पदावर असलेल्या कोणत्याही पंचायतीच्या (निवडून आलेल्या किंवा नियुक्त केलेल्या) सदस्यांचा पदावधी, (यामध्ये कोणताही वाढीव पदावधी समाविष्ट आहे) किंवा कोणत्याही पंचायतीच्या एका किंवा अनेक प्रशासकांचा पदावधी (मग त्यांचा पदावधी उक्त दिनांकाच्या पूर्वी समाप्त झालेला असो किंवा त्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर उक्त मुदतीत कोणत्याही वेळी समाप्त होणार असो) यथास्थिती वाढविण्यात आला असल्याचे किंवा वाढविण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल आणि असा प्रत्येक सदस्य किंवा प्रशासक उक्त मुदतीत पद धारण करण्याचे चालू ठेवील :

परंतु या कलमाद्वारे वाढविण्यात आलेला सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी संपल्यावर ते, पुनर्घटित पंचायतीच्या गणपूर्ती असलेल्या पहिल्या बैठकीपर्यंत पदावर असण्याचे चालू राहील.

पदावधी वाढविण्यात आलेल्या सदस्यांचे व प्रशासकांचे अधिकार व विवक्षित कृत्यांचे विधिग्राह्यीकरण.

४. लगतपूर्वीच्या कलमान्वये ज्यांचा पदावधी यथास्थिति वाढविण्यात आल्याचे मानण्यात आले आहे किंवा तो वाढविण्यात आला आहे असे, पंचायतीचे सर्व सदस्य व पंचायतीचे सर्व प्रशासक, त्यांच्या वाढीव पदावधीत देखील (मग तो या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी वाढविण्यात आला असो वा नंतर वाढविण्यात आला असो) यथास्थिती असे सदस्य किंवा प्रशासक म्हणून सर्व अधिकारांचा वापर करण्यास व सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व तसे करण्यास ते सक्षम असतील व अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने उक्त मुदतीपूर्वी किंवा मुदतीमध्ये केलेले कोणतेही कृत्य अशा सदस्याचा किंवा प्रशासकाचा पदावधी विवक्षित वेळेवर वाढविण्यात आलेला नव्हता किंवा अन्यथा यथोचित रीत्या वाढविण्यात आलेला नव्हता किंवा वाढविण्यात आलेल्या मुदतीत ती पंचायत, सदस्य किंवा प्रशासक, यथास्थिती पंचायतीच्या, सदस्याच्या किंवा प्रशासकाच्या सर्व अधिकारांचा वापर करू शकले नाहीत व सर्व कर्तव्ये व कामे पार पाडू शकले नाहीत याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही किंवा त्याने केलेल्या कोणत्याही कृत्यास केवळ याच कारणावरून कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा वाढीव पदावधी समाप्त झाल्यावर नवीन पंचायती पुनर्घटित करण्याकरिता करावयाची व्यवस्था.

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील अशा (उक्त मुदत संपण्यापूर्वीच्या असलेल्या) दिनांकानंतर जिल्हाधिकारी व संबंधित इतर अधिकारी, विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा या अधिनियमाद्वारे वाढविण्यात आलेला पदावधी संपण्यापूर्वी किंवा संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर, पंचायत अधिनियमाच्या व तदन्वये करण्यात आलेले नियम व उपविधी यांच्या तरतुदींनुसार नवीन पंचायती स्थापन करण्याची व्यवस्था करतील.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ३ ची प्रयुक्ती.

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून पंचायत अधिनियमाच्या तरतुदी इतर सर्व बाबतीत संबंधित पंचायतीना लागू होतील.

अडचणी दूर करणे.

७. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंग पडल्यास, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल.

१९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ चे निरसन व व्यावृत्ती.

८. (१) 'महाराष्ट्र ग्रामपंचायती (राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे विवक्षित निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८७' हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये यथास्थिति करण्यात किंवा काढण्यात आल्याचे मानण्यात येईल. १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २.

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.